# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२३ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### भाऊ फक्त एक

महापालिका निवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. तरीही सर्वच पक्षाचे उमेदवार दंड थोपटून निवडणूक रिंगणात आहे. मोठ्या पक्षाचे उमेदवार पॅनलने निवडणूक लढवित आहेत. कालपर्यंत पॅनलचे उमेदवार एकत्र फिरून मते मागत होते. परंतु, शेवटच्या टप्प्यात आता पॅनलचे उमेदवार विखुरले आहेत. या उमेदवारांना माहित आहे की, मतदार पॅनलला मतदान न करता पसंतीच्या उमेदवाराला मते देतील. त्यामुळे जो तो उमेदवार आपल्याला कशी मते मिळतील याचा विचार करीत आहेत. काही उमेदवारांनी दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराचा आसरा घेतला आहे. माझ्या परिसरातून मी तुला मदत करतो, तुझ्या परिसरातून तू मला मदत कर अशा बोलणी सुरू आहे. प्रत्येक उमेदवाराला आपण निवडून यावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यासाठी ते काहीही करायला तयार आहेत. निवडणुकीपर्यंत मतदारांना नाराज करू नका असे वरिष्ठ नेत्यांचे आदेश आहेत. उमेदवार देखील नम्रपणे मतदारांशी व्यवहार करताना दिसत आहेत. काय हव, नको याची आस्थेने विचारपूस करीत आहेत. आता नाही, तर कधीच नाही. भाऊ उद्या निवडून आल्यावर आपल्याला विचारणार देखील नाही हे मतदारांना माहित आहे. त्यामुळे मतदार देखील वाहत्या गंगेत हात धुऊन घेत आहेत. मात्र, मतदारांची आस्थेने विचारपूस करताना हे उमेदवार भाऊ फक्त एक असे बोलून एक बोट दाखवायला देखील विसरत नाहीत.

# मतदानासाठी मनपाची यंत्रणा सज्ज

## अधिकाधिक संख्येत मतदान करा : आयुक्तांनी केले आवाहन

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १४

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२६ करिता गुरुवारी १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजेपासून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ३००४ मतदान केंद्रात मतदान केले जाणार आहे. शहरातील मतदारांनी आपला हक्क व कर्तव्याचे वहन करावे,आणि अधिकाधिक संख्येत मतदान करावे असे आवाहन मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.



मतदान केंद्रावर निवडणुकीचे साहित्य नेताना कर्मचारी

नागपूर शहरातील २४,८३,११२ मतदार आपला मताधिकाराचा वापर करणार असून यामध्ये १२,२६,६९० पुरुष आणि १२,५६,११६ महिलांचा समावेश आहे. मतदारांना ३८ बहु सदस्यीय प्रभाग पद्धतीमधून १५१ सदस्यांची निवड करायची आहे. मतदारांना प्रभाग क्रमांक १ ते ३७ करिता ४ मत द्यायचे आहे, तर प्रभाग क्रमांक ३८ करिता ३ मत द्यायचे आहे. यावेळी ९९३ उमेदवार रिंगणात आहे. मतदानासाठी सर्व तयारी झाली असून, ५०४ बसेस मधून मतदान साहित्य आणि पथकाला मतदान केंद्रात पोहचविण्यात आले आहे. मतमोजणी १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपासून महानगरपालिकेच्या झोन स्तरावर १० ठिकाणी होणार आहे.

नागपूर महानगरपालिका तर्फे ९६४ इमारती मध्ये ३००४ मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. यासाठी ३५७९ केंद्राध्यक्ष आणि १०,७३७ मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रात १ पोलीस/ होम गार्ड राहणार असून, २४४ झोनल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रात किमान अत्यावश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागपूर पोलीस प्रमाणे संवेदनशील मतदान केंद्राची संख्या ३२१ असून, इथे आवश्यक पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. मतदारांसाठी दहाही झोन मध्ये प्रत्येकी एक पिंक मतदान केंद्र आणि एक आदर्श मतदान केंद्रची व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून डॉ. माधवी खोडे-चवरे यांची नियुक्ती करण्यात आली असून, निवडणूक निरीक्षक म्हणून संतोष थिटे त्यांना सहकार्य करणार आहेत. मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत आणि श्रीमती वैष्णवी बी सुद्धा मतदान आणि मतमोजणी प्रक्रीयावर नजर ठेवून आहे.

मतदारांना आपले मतदान केंद्र शोधणे सुलभ व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने नवे डीजीटल प्लॅटफॉर्म मतदारांना उपलब्ध करून दिले आहे. मतदारांना आता मतदान केंद्र मनपाच्या संकेतस्थळा सोबतच मनपाचे चॅटबॉट, एआय मित्र व माय नागपूर ऍपवर मतदान केंद्र तात्काळ शोधता येणार आहे. यासंदर्भात या डीजीटल प्लॉटफॉर्मवर मनपाने आपले मतदान केंद्र ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यात मतदारांना मतदार ओळखपत्रावर असलेले नाव किंवा मतदार ओळखपत्र क्रमांक (ईपीआयसी) नुसार शोधता येणार आहे. मतदाराला मराठी किंवा इंग्रजी भाषेचा नाव शोधण्यासाठी उपयोग करता येणार आहे. मतदारांनी ईपीक क्रमांकानुसार मतदान केंद्र शोधल्यास अधिक अचूक व तात्काळ माहिती मिळू शकेल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर १० मतमोजणी केंद्राची स्थापना करण्यात आली असून, १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. साधारणतः प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कडे २० टेबल ईवीएम साठी तसेच पोस्टल बेलेट साठी ४ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक टेबल वर एक मतमोजणी पर्यवेक्षक व एक सहायक नियुक्त करण्यात आले आहे.

## झिरोमाईल भूयारी प्रकरणातून नासुप्रची माघार

नागपूर, दि. १४

झिरो माईल परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी प्रस्तावित मानस चौक ते सिव्हिल लाईन्स अशा भूयारी मार्गाच्या निर्मितीबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका प्रलंबित आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्या उच्च न्यायालयाने प्रकरणातील मुद्द्यांचे गांभीर्य लक्षात घेत सुनावणी लांबणीवर ढकलली.

मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान नासुप्रच्या वतीने अधिवक्ता सुधीर पुराणिक तसेच केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या वतीने अधिवक्ता मुग्धा चांदुरकर यांनी या प्रकरणातून माघार घेण्याची विनंती केली. या वेळी न्यायालयीन मित्र ॲड. महल्ले उपस्थित होते, तर महापालिकेच्या वतीने ॲड. जेमिनी कासट यांनी बाजू मांडली. सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने महामेट्रोच्या या भूयारी मार्गाला आवश्यक त्या सर्व मंजुरींबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. अंडरपाससाठी संरक्षण विभागाची आवश्यक परवानगी अद्याप घेण्यात न आल्याबाबत न्यायालयाने यापूर्वी तीव्र चिंता व्यक्त केली होती.

## मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांकारिता विशेष सोय

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १४

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी गुरूवार १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. याप्रक्रीये दिव्यांग मतदारांना उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविता यावा करिता मनपा प्रशासनाद्वारे दिव्यांग मतदारांकारिता विशेष सोय करण्यात आली आहे. मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या नेतृत्त्वात मनपाने दिव्यांग मतदारांकारिता ९१७५४१४३५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक निर्गमित केला आहे. यावर लोकेशन शेअर केल्यानंतर मतदान बूथ वर ये-जा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक झोन मध्ये एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या संदर्भात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असून, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दिव्यांग मतदारांसाठी मनपातर्फे ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर सुलभता व सहाय्यता करीत सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मनपा केंद्रीय कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. याद्वारे दिव्यांग मतदारांना मतदानाच्या दिवशी अर्थात गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत त्यांच्या निवास स्थानावरून मतदान केंद्र/ पोलिंग बूथ वर ने-आण करण्यासाठी प्रत्येक झोन मध्ये झोनल वैद्यकीय अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग मतदारांना या सुविधेचा सुलभ वापर करता यावा यासाठी केंद्रीय स्तरावर ९१७५४१४३५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. दिव्यांग मतदारांना या व्हॉट्सॲप क्रमांकावर आपली लोकेशन शेअर करायची आहे किंवा ते कॉल करून देखील माहिती देऊ शकतात. केंद्रीय स्तरावर दोन सत्रात दोन चमूची नियुक्ती करण्यात आली आहे.या चमूमार्फत प्राप्त माहितीनुसार, झोन स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही केली जाणार आहे. याकरिता दहा पथक नेमण्यात आले आहे.

## पोलिस अधिकारी आणि अंमलदारांचा सत्कार

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १४

नागपूर ग्रामीण पोलिस दलात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या ६६ पोलिस अधिकारी आणि अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

आरोपींवर मोक्का, एमपीडीए अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करून अंमली पदार्थाची कारवाई, गुन्हे उघडकीस आणणे, उत्कृष्ट तपास करून आरोपींना शिक्षा झाल्याप्रकरणी अशी महत्वपूर्ण कामगिरी या अधिकारी आणि अंमलदारांनी केली. या कामगिरीबद्दल पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी या अधिकारी आणि अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला. याप्रसंगी अप्पर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी आणि ठाणेदार उपस्थित होते.

## ६७ बिनविरोध उमेदवारांना तात्पुरता दिलासा

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. १४

महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुकांभोवती निर्माण झालेल्या बिनविरोध निवडींच्या वादाला आज उच्च न्यायालयात मोठा राजकीय वळण मिळाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते यांनी दाखल केलेली बिनविरोध निवडींना स्थगिती देण्याची मागणी करणारी रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यामुळे सत्ताधारी पक्षांच्या ६७ बिनविरोध उमेदवारांना तातडीचा दिलासा मिळाला, तर विरोधकांच्या गोटात नाराजीचे वातावरण पसरले आहे.

या याचिकेवर तातडीची सुनावणी घेण्यात आली. अविनाश जाधव यांच्यासह त्यांचे वकील यांनी न्यायालयात ठाम भूमिका मांडत, "बिनविरोध निवडी न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करून ठरावीक कालमर्यादेत तपासल्या जाव्यात," अशी मागणी केली होती.

कारण (१५ जानेवारी) मतदान असून, १६ जानेवारीला मतमोजणी आहे. त्यामुळे आजच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, उच्च न्यायालयाने याचिका फेटाळत या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

२९ महापालिकांच्या निवडणूक प्रक्रियेत भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस या सत्ताधारी पक्षांचे तब्बल ६७ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली होती.

विरोधकांकडून आरोप करण्यात आला की, दमदाटी, दबाव, आर्थिक प्रलोभने देत अनेक उमेदवारांना अर्ज मागे घ्यायला भाग पाडले गेले. या कथित गैरप्रकारांच्या गंभीरतेकडे लक्ष वेधण्यासाठीच अविनाश जाधव यांनी ही याचिका दाखल केली होती.

## कारचोरास अटक

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १४

घरासमोर ठेवलेली कार चोरून नेणाऱ्या एका कारचोरास गुन्हे शाखेच्या वाहनचोरी विरोधी पथकाने अटक करून त्याच्या ताब्यातून चोरीची कार जप्त करण्यात आली.

शेख नवीन अफसर (२२) रेनाखर्डी, ता. पाथरी, जि. परभणी असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहेत.

भीमवाडी, संजय गांधीनगर येथे राहणारे सुरेंद्र मनोहर टोंगे (५०) यांच्याकडे टॅक्सी परमीट असलेली इर्टिगा कार आहे. ३ जानेवारी रोजी मध्यरात्री १२.१० च्या सुमारास त्यांनी घरासमोर कार उभी केली होती. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरांनी कार चोरून नेली. दुसऱ्या दिवशी ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी यशोधरानगर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासात वाहनचोरी विरोधी पथकाने तांत्रिकरित्या तपास करून परभणी येथून शेख नवीन अफसर यास ताब्यात घेतले.

## ईव्हीएमसोबत नवे मशीन नेमके काय ?

### राज ठाकरे निवडणूक आयोगावर संतापले

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. १४

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी शिगेला असताना, गुरुवार १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष यांनी निवडणूक आयोगाच्या एका नव्या निर्णयावर जोरदार आक्षेप घेतला आहे. प्रचाराची मुदत संपल्यानंतरही मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मतदारांच्या भेटी घेण्यास दिलेली मुभा आणि सोबत जोडल्या गेलेल्या या नव्या मशीनवर त्यांनी संशय व्यक्त करत तीव्र शब्दांत टीका केली.

माध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे म्हणाले की, आतापर्यंत प्रचार संध्याकाळी ५ वाजता संपला की दुसरा दिवस 'शांततेचा' असायचा आणि त्यानंतर मतदानहीच परंपरा होती. मात्र आता प्रचार थांबूनही उमेदवारांना थेट मतदानाच्या दिवशीपर्यंत घरोघरी जाण्याची मुभा देण्यात आली आहे.



"हा नियम केवळ याच निवडणुकीत का? विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत का नव्हता?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

राज ठाकरे यांनी या नव्या नियमावरून निवडणूक आयोग आणि सरकारवर गंभीर आरोप केले.

"पत्रक वाटू शकत नाही म्हणता, पण मतदारांना भेटता येतंम्हणजे पैसे वाटण्याची मुभा आहे का? कायदा बदलला का? नोटिफिकेशन कधी आणि कुणासाठी काढलं?" असे प्रश्न त्यांनी एकामागून एक विचारले.

राज ठाकरे यांनी सोबत जोडल्या गेलेल्या या मशीनबाबतही तीव्र शंका उपस्थित केली. "ही मशीन कोणत्याही राजकीय पक्षाला दाखवली नाही. लोकांना माहीत नाही, आम्हालाही माहीत नाही. ईव्हीएम जुनी झाली म्हणून युनिट लावतो म्हणतात, पण ही नवी मशीन नक्की काय करते?" असा सवाल त्यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी या मशीनबाबत माहिती देण्याची मागणी करत आयोगाला पत्र दिले, तरीही ते दाखवण्याचे सौजन्यही पाळले गेले नसल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला.

राज ठाकरे यांनी थेट आवाहन करत शिवसैनिक आणि मनसेसैनिकांना सतर्क राहण्यास सांगितले.

"उमेदवार लोकांकडे जात आहेत, पैसे कसे वाटले जात आहेत हे दिसतंय. भाजप आणि शिंदे गटाच्या पॅम्प्लेटमध्ये पैसे टाकून दिले जात आहेत.

## मतदानाआधी शिवतीर्थावर रणनिती

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. १४

महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानाआधी मनसे अध्यक्ष यांनी आज मुंबईतील शिवतीर्थ या निवासस्थानी उमेदवारांचे प्रतिनिधी यांची महत्त्वपूर्ण बैठक घेतली. मतदानाच्या अंतिम टप्प्यावर ही बैठक पार पडल्याने, निवडणूक यंत्रणा, मतदान दिवशीची तयारी, कार्यकर्त्यांची जबाबदारी आणि मतदारांशी समन्वय याबाबत स्पष्ट मार्गदर्शन करण्यात आले.

शिवतीर्थावर झालेल्या या बैठकीत राज ठाकरे यांनी प्रतिनिधींना शिस्तबद्ध कामकाज, प्रत्येक मताचा सन्मान आणि शेवटच्या क्षणापर्यंत सज्ज राहण्याचा स्पष्ट संदेश दिल्याचे सांगितले जाते. प्रचाराचा धुरळा खाली बसल्यानंतरही निवडणुकीच्या रणांगणात एकही चूक होऊ नये, यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या बैठकीनंतर राज ठाकरे यांनी मुंबादेवी मंदिर येथे दर्शन घेतले. मुंबई नगरीची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबादेवीच्या चरणी नतमस्तक होत, येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला यश मिळावे, अशी त्यांनी प्रार्थना केली. मतदानाआधीचे हे देवदर्शन राजकीय वर्तुळात अर्थपूर्ण मानले जात आहे.

मतदानाआधी शिवतीर्थावर घेतलेली रणनीती बैठक आणि त्यानंतर मुंबादेवीचे दर्शनया दोन टप्प्यांतून मनसे प्रमुखांनी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. निवडणूक प्रचार संपला असला, तरी निर्णयाच्या क्षणी नेतृत्व सक्रिय असल्याचा संदेश या निमित्ताने देण्यात आला आहे.

शिवतीर्थावर ठरलेली रणनिती आणि मुंबादेवीच्या चरणी मागितलेला आशीर्वादयाचा प्रभाव निकालात कितपत दिसून येतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.







## मोबाईलच्या युगात मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे कौतुकास्पद : आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** मोबाईलच्या युगात मैदानी खेळ व पारंपरिक संस्कृती मागे पडत आहे. अशा परिस्थितीत मैदानी कबड्डी स्पर्धा आयोजित करून आपली परंपरा जपली जात आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. कार्यक्रमास्थळापर्यंत आमदार मुनगंटीवार यांची बैलबंडीवरून लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. तसेच लाडूतुला करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अनेक वर्षांनंतर बैलबंडीवर बसण्याचा योग आल्याची भावना आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. प्रेमाने व आपुलकीने केलेल्या स्वागताबद्दल साखरवाहीतील कार्यकर्ते व ग्रामस्थांचे त्यांनी आभारही मानले.चंद्रपूर तालुक्यातील साखरवाही येथे जगदंब क्रीडा मंडळ व जय बजरंग क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुषांच्या भव्य कबड्डी सामन्या-चे उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महिंद्र गावंडे, श्रेयस भालेराव, ब्रिजभूषण पाझारे, अनिल डोंगरे, शोभाताई पिदूरकर, विनोद खापने, सुरेश सोयाम, सिद्धार्थ कवाडे, रामभाऊ कडुकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.आमदार मुनगंटीवार म्हणाले, '१९९५ ते २००९ मी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. येथील नागरिकांनी मला काय-मच प्रेम आणि आशिर्वाद दिले. त्यामुळे येथील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे निमंत्रण दिले, तेव्हा आनंदाने स्वीकारले. जवळपास पंधरा वर्षांनी आपल्याला भेटताना आनंद होत आहे. या गावाच्या सेवेसाठी कधीही आवाज द्या, तुमच्यासाठी धावून येईल. कारण १९९५ मध्ये तुम्ही निवडून दिले नसते तर मी आज शेतकऱ्यांचे, उपेक्षितांचे प्रश्न विधानसभेत मांडू शकलो नसतो.'

# आज मतदान ४५१ उमेदवारांचे भाग्य मशीनबंद होणार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** महानगरपालिका निवडणुकीसाठी उद्या १५ जोनवारी रोजी मतदान होत असून, शहरातील राजकीय वातावरण निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. विविध राजकीय पक्ष व अपक्ष असे एकूण ४५१ उमेदवार १५ जानेवारीला मतदारांच्या कौलावर अवलंबून असून, संध्याकाळी मतदान प्रक्रिया पूर्ण होताच त्यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला ईव्हीएममध्ये मशीनबंद होणार आहे.

शहरातील सर्व प्रभागांमध्ये सकाळपासूनच मतदान केंद्रांवर हालचालींना वेग आला आहे. मनपा प्रशासनाने मतदान प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक पार पडावी यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केली आहे. मतदान अधिकारी, कर्मचारी व सुरक्षा यंत्रणा सकाळपासूनच सज्ज असून मतदान केंद्रांवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा, पिण्याचे पाणी, छाया व्यवस्था तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारां-साठी विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ईव्हीएम यंत्रांची अंतिम तपासणी पूर्ण झाली असून तांत्रिक अडचणींसाठी राखीव यंत्रे उपलब्ध ठेवण्यात आली आहेत.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान केंद्रा-च्या परिसरात आचारसंहिता काटेकोरपणे राबवली जात आहे. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही नि-रीक्षण तसेच मोबाईल पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून सतत नजर ठेवली जात आहे.दरम्यान, मागील काही दिवसांत प्रचाराच्या रणधुमाळीनंतर आज मतदार शांतपणे मतदानाचा हक्क बजावणार आहेत.विविध पक्षांच्या नेत्यांसह उमेदवार आणि कार्यकर्त्यांचे लक्ष आता मतदारांच्या सहभागाकडे लागले असून, मतदानाच्या टक्केवा-रीकडे सर्वांचे लक्ष आहे.लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत नागरिकांनी निर्भयपणे व उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मतदान संपल्यानंतर उमेदवारांचे भाग्य मशीनबंद होणार असून, निकालाच्या प्रतीक्षेला सुरुवात होणार आहे.

## मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस मद्यविक्री बंद

शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया शांततेत, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी चंद्रपूर शहर मह-नगरपालिका हद्दीतील सर्व प्रकारच्या किरकोळ मद्य, बिअर व ताडी विक्री अनुज्ञप्त्या तीन दिवस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत.राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, चंद्रपूर शहर महानगरपालिकेसाठी दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान व दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी तसेच मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## मतदान प्रक्रियेसाठी मनपा प्रशासन सज्ज



चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने उद्या गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ०७:३० ते संध्याकाळी ०५:३० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.मतदारांना सुरक्षित, सुलभ व आदर्श मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून सर्वकष तयारी करण्यात आली आहे.मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी मनपा प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे.चंद्रपूर महानगरपालिका मतदारसंघात २ लक्ष ९९ हजार ९९४ मतदारांसाठी ३५५ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहे. महिला मतदारांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी उभारण्यात आलेल्या ५ पिंक बूथमध्ये महिला कर्मचारी, सुरक्षित वातावरण, विशेष सजावट व आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तर आदर्श बूथ हे स्वच्छता, सुव्यवस्थित रचना, योग्य मार्गदर्शन व आदर्श व्यवस्थापनासाठी ओळखले जाणार आहेत.ईव्हीएम मध्ये काही बिघाड झाल्यास संबंधित कंपनीचे ३ तज्ञ व शीघ्र प्रतिसाद पथक सुद्धा तयार ठेवण्यात आले आहेत.मतदार संघांवर मतदा-रांना सहकार्यासाठी बीएलओ व एक सहायक ठेवण्यात आले आहेत. मतमोजणी महानगरपालिका झोन क्रमांक ३ येथे होणार असुन यासाठी १५५० बॅलेट युनिट, ७२० कंट्रोल युनीट उपलब्ध आहेत.

## मतविभाजनाचा फटका कोणाला बसणार?

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** चंद्रपूर मनपा निवडणुकीत यंदा बहुरंगी राजकीय चित्र पाहायला मिळत असून, मतविभाजनाचा फटका नेमका कोणाला बसणार याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. प्रमुख पक्षांसह अपक्ष उमेदवार मोठ्या संख्येने रिंगणात उतरल्याने प्रत्येक प्रभागात चुरशीची लढत होत असून, मतांचे विभाजन निकालावर निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



काही प्रभागांमध्ये एकाच विचारसरणीचे अनेक उमेदवार मैदानात असल्याने पारंपरिक मतदार विभागला जाण्याची शक्यता आहे. विशेषतः बंडखोर उमेदवार, अपक्षांची संख्या आणि छोट्या पक्षांची उपस्थिती यामुळे मोठ्या पक्षांचे गणित बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा थेट परिणाम विजयी उमेदवाराच्या मताधिक्यावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहेत.

सत्ताधारी व विरोधी पक्ष दोघांसाठीही मतविभाजन डोकेदुखी ठरू शकते. काही प्रभागांत स्थानिक मुद्दे, उमेदवारांची वैयक्तिक लोकप्रियता तसेच अंतर्गत गटबाजी यामुळे पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तिकेंद्रित मतदान होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे पारंपरिक मतपेढीवर अवलंबून राहिलेल्या उमेदवारांना फटका बसण्याची शक्यता वाढली आहे.

ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरित झालेला मतदार, नवमतदार तसेच तरुणांचा कल कोणत्या दिशेने जातो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या घटकांचा कल जर एकाच बाजूने न राहता विभागला गेला, तर त्याचा फायदा एखाद्या तिसऱ्याच उमेदवाराला होऊ शकतो, अशीही चर्चा आहे. दरम्यान, प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात सर्वच पक्षांनी मतविभाजन टाळण्यासाठी जोरदार प्रयत्न केले.

मात्र मतदार प्रत्यक्ष मतदानात कोणाला पसंती देतात, हे निकालातूनच स्पष्ट होणार आहे. मतविभाजनाचा फटका नेमका कोणाला बसतो, हे येणाऱ्या निकालानंतरच ठरणार असून, चंद्रपूरच्या राजकारणाची दिशा ठरवणारा हा निकाल ठरणार आहे.

# चंद्रपूरच्या अलीची गुजरात येथे अखिल भारतीय सागरी जलतरणात झेप



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** जन्मजात गहन श्रवणबाधा असतानाही जिद्द, चिकाटी आणि संवेदनशील नेतृत्वाच्या पाठबळावर चंद्रपूरच्या अली मुहम्मद रियाझखान घौरी या विशेष बालकाने अखिल भारतीय स्तरावर प्रेरणादायी यश संपादन केले आहे. गुजरात राज्यातील पोरबंदर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय ५ कि.मी. सागरी जलतरण स्पर्धेत अलीने द्वितीय क्रमांक मिळवत चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विशेष म्हणजे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून काही महिन्यांपूर्वी या बालकावर कोक्लिअर प्रोसेसर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर अलीच्या आत्मविश्वासाला भरारी मिळाली आणि आता त्याने आपली क्षमता सिद्ध केली.

अली हा द्विपक्षीय कोक्लिअर इम्प्लांट केलेला विशेष बालक आहे. सन २०२३ मध्ये त्याच्या एका साऊंड प्रोसेसरमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड झाल्याने तो पूर्णपणे बंद पडला होता. इयत्ता १० वीच्या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर असताना एका प्रोसेसरवर शिक्षण, दैनंदिन जीवन आणि क्रीडा सराव करणे अलीसाठी अत्यंत कठीण झाले. साऊंड प्रोसेसरची किंमत लाखोंमध्ये असल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते.

शासकीय योजनांमध्ये कोक्लिअर इम्प्लांटनंतर पुन्हा साऊंड प्रोसेसर देण्याची तरतूद नसतानाही, ही बाब मानवीय आणि अपवादात्मक असल्याचे ओळखून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी खनिज निधी अंतर्गत विशेष बाब म्हणून सुमारे सात लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून दिला. या निधीतून अलीसाठी नवीन साऊंड प्रोसेसर उपलब्ध झाला आणि त्याचे थांबलेले आयुष्य पुन्हा गतीमान झाले.

या मोलाच्या मदतीमुळे अलीने यशस्वीरित्या इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण केली. हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवत त्याने पोहण्याच्या सरावाला नवे बळ दिले आणि त्याच आत्मविश्वासाच्या जोरावर ४ जानेवारी रोजी पोरबंदर येथे झालेल्या समुद्री पोहणे स्पर्धेत देशभरातील स्पर्धकांना मागे टाकत द्वितीय क्रमांक पटकावला.शासनाच्या नियमांच्या चौकटी-पलीकडे जाऊन मानवीय दृष्टिकोनातून दिलेली ही मदत केवळ आर्थिक नव्हे, तर एका विशेष बालकाच्या जीवनाला नवी दिशा देणारी ठरली आहे. अलीच्या या यशामुळे चंद्रपूर जिल्ह्याचा गौरव वाढला असून आ.सुधीर मुनगंटीवार यांची संवेदनशील नेतृत्व समाजात किती मोठा सकारात्मक बदल घडवू शकते, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.

## अविष्कार २०२५-२६ मध्ये डॉ.खत्री महाविद्यालयाची उल्लेखनीय कामगीरी



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या वतीने आयोजीत आंतर महाविद्यालयीन संशोधन उत्सव 'अविष्कार २०२५-२६' मध्ये डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत महाविद्यालयातुन एकुन ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ०६ विद्यार्थ्यांचा त्यामध्ये आशीष देरकर, सुनंदा कुमरे, ऐश्वर्या महेशकर, प्रियंका मडावी, अमित पाटील आणि प्रणाली उपरे या विद्यार्थ्यांची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत मानव्यशास्त्र, वाणिज्य, विज्ञान आणि आंतर विद्याशाखीय संशोधन अश्या विविध विषयात विद्यार्थ्यांनी आपले संशोधन सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांना परिक्षकानकडुन विशेष प्रशंसा मिळाली. त्यांच्या संशोधनातील नाविण्य, विषयाची मांडणी आणि समाज उपयोगी दृष्टीकोन व सादरीकरण कौशल्य याचा विशेष उल्लेख करण्यात आला.या यशासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन कार्याला नवी उंची मिळाली असुन महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे.

## जिल्ह्याची खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** जिल्ह्यातील खरीप हंगामाची १७८८ गावांची अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्याची पैसेवारी ०.५४ पैसे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १८३६ गावे असून खरीप पिकांची १८३३ गावे आहेत. त्यापैकी १७८८ गावांची अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरीत ४८ गावांमध्ये पीक नसल्यामुळे सदर गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. चंद्रपूर जिल्ह्यात एकूण गावांची संख्या १८३६, पैसेवारी जाहीर करावयाची गावे १७८८, ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ९४२, तर ५० पैसे व त्यापेक्षा जास्त पैसेवारी असलेल्या गावांची संख्या ८४६ आहे.

## राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचालनासाठी निवड

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** येथील सरदार पटेल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविका कु. टिंक्कल उईके व स्वयंसेवक सूरज पेंदोर यांची दि. २६ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचालनासाठी निवड झाली आहे.

ही निवड महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिस्त, समर्पण व राष्ट्रीय सेवेची भावना या बाबी महत्वपूर्ण ठरल्याचे मत व्यक्त करीत त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. पुरुषोत्तम माहोरे, डॉ. निखिल देशमुख, डॉ. वंदना खनके प्रामुख्याने उपस्थित होते.

## शिक्षणाचे मूल्य वाढविण्यासाठी पदवीला कौशल्याची जोड आवश्यक

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** एखाद्या विषयातील पदवी ही विद्यार्थ्याची शैक्षणिक योग्यता दर्शवते; मात्र त्या पदवीला कौशल्याची जोड मिळाल्यासच विद्यार्थी खऱ्या अर्थाने रोजगारक्षम बनतो, असे प्रतिपादन राज्यपाल महोदयांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले.एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई अंतर्गत महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर ( विद्यापीठाचे बल्लारपूर उपकेंद्र) येथे शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी भेट दिली. यावेळी विद्यार्थिनींशी विशेष संवाद साधताना ते बोलत होते.यावेळी त्यांच्यासोबत माननीय राज्यपालांचे अतिरिक्त परिवार प्रबंधक श्री. रमेश येवले, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड, आवार समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त आदी उपस्थित होते. या वेळी डॉ. नारनवरे यांनी वर्तमान शैक्षणिक स्थिती, चंद्रपूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व विकासाच्या शक्यता यावर विद्यार्थिनींशी संवाद साधला. मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत नारनवरे म्हणाले की, एकेकाळी पदवीधारकाला समाजात विशेष दर्जा होता. विशिष्ट शाखेची पदवी म्हणजे रोजगाराची हमी असे मानले जात असे; मात्र आज 'पदवीधर बेरोजगार' हे कटू सत्य आहे. त्यामुळे केवळ पदवी असून चालणार नाही, तर त्या क्षेत्रातील कौशल्य आत्मसात करणे अत्यावश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा वनसंपदेने नटलेला, इतिहासदृष्ट्या समृद्ध व नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण आहे. येथील मनुष्यबळ व येणाऱ्या रोजगार संधी लक्षात घेता जिल्ह्याचे भविष्य उज्ज्वल आहे. अशा समृद्ध जिल्ह्यात एसएनडीटी महिला विद्यापीठासारख्या संस्थेतून शिक्षण घेणे ही अभिमानाची बाब असून या भागातील विद्यार्थिनींनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा. तसेच शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर मोठा प्रभाव पडत असल्याने प्राध्यापकांनी सतत अद्ययावत राहून स्वतःला सक्षम व स्वयंपूर्ण बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी बल्लारपूर केंद्राच्या प्रगतीचा आढावा मांडला. कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांत वाढलेली विद्यार्थिनींची पटसंख्या, शैक्षणिक दर्जा, अभ्यासक्रमासोबत राबविले जाणारे विविध उपक्रम आणि त्यामध्ये प्राध्यापकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. अपेक्षा पिंपळे यांनी केले तर आभार सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड यांनी मानले. कार्यक्रमास सर्व विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## सरदार पटेल महाविद्यालयामध्ये आर्ट ऑफ कॉन्सन्ट्रेशन वर प्रेरणादायी व्याख्यान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** सरदार पटेल महाविद्यालयात 'आर्ट ऑफ कॉन्सन्ट्रेशन' या विषयावर प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.अरविंदजी पोरेड्डीवार होते. प्रमुख वक्ते म्हणून स्वामी अनुकूलानंद यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, सी. जे. खैरवार, स्वामी प्रत्ययानंद, स्वामिनी हरिप्रियानंदा आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंदजी पोरेड्डीवार यांनी सन्मान चिन्ह देऊन स्वामी अनुकूलानंद यांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत कार्यक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकला.

# दुर्गापूर शाखेत आर्थिक व डिजिटल साक्षरता शिबिर ; महिलांना कर्ज वितरण

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांची उपस्थिती



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.१४ :** ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक व्यवहारांची योग्य माहिती मिळावी, डिजिटल बँकिंगचा सुरक्षित वापर करता यावा तसेच ऑनलाईन फसवणुकीपासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने शाखा दुर्गापूरच्या वतीने नाबार्डच्या Financial Inclusion Fund (FIF) योजनेअंतर्गत आर्थिक व डिजिटल साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिक, बचतगटांच्या महिला व बँक ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा काँग्रेस नेते दिनेश दादापाटील चोखारे उपस्थित होते. याशिवाय तृनाल फुलझेले (नाबार्ड व्यवस्थापक), राज दर्वे (आयटी विभाग प्रमुख), प्रशांत तोटावार (विभागीय अधिकारी - मुल), शाखा व्यवस्थापक मनोज घिवे, निरीक्षक सुनील खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास चोरगाव सेवा संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग कोकोडे, पदमापूर सेवा संस्थेचे अध्यक्ष किसनराव उपरे, खैरगाव सेवा संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ नागरकर, वरवट सेवा संस्थेचे अध्यक्ष घनश्याम डाखरे, कृषी सहाय्यक अधिकारी भोई, विविध सेवा संस्थांचे गटसचिव, सभासद, आय.आर.व्ही. सौ. लता रामटेके, तसेच विविध महिला बचतगटांच्या सदस्य व बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात उपस्थित तज्ज्ञांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व विशद करताना बँकिंग व्यवहार, बचत व गुंतवणूक, डिजिटल पेमेंट प्रणाली, मोबाईल बँकिंग, यूपीआय वापर, तसेच ऑनलाईन फसवणूक कशी टाळावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा, बँकेच्या विविध योजना व कर्जसुविधा याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाखा दुर्गापूरच्या वतीने FIDGI Camp चे आयोजन करण्यात आले. यावेळी दिनेश दादापाटील चोखारे यांच्या हस्ते प्रज्ञा महिला बचतगट, दुर्गापूर यांना २,००,००० (रुपये दोन लाख) बचतगट कॅश क्रेडिट कर्जाचे वितरण करण्यात आले. या कर्जाच्या माध्यमातून बचतगटातील महिलांना व्यवसायवृद्धी व आर्थिक स्वावलंबन साधता येणार आहे.

ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण, स्वावलंबन आणि आर्थिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. आर्थिक व डिजिटल साक्षरतेमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती दि.१४ :** तालुक्यातील सेंट ॲन्स हायस्कूल, सुमठाणा येथे मंगळवारी राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित चित्रकला स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक हक्क व जबाबदाऱ्यांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

२४ डिसेंबर रोजी भद्रावती शहरातील यशवंतराव शिंदे महाविद्यालयात तहसील कार्यालय भद्रावती तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा, भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विधी करमरकर हिचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या उमर हनफी यालाही सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला.

दैनिक
युवाराष्ट्र दर्शन
# यवतमाळ
गुरुवार, १५ जानेवारी २०२६
जिल्हा



## महिला विद्यालय येथे नायलॉन मांजा बंदी प्रतिज्ञा

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, प्रतिनिधी, दि.१४ जानेवारी**

दिनांक 14 जानेवारी 2026 रोजी महिला विद्यालया येथे मकर संक्रांत निमित्त विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनींना नायलॉन मांजामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून देण्यात आली व नायलॉन मांजाचा वापर करू नये याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आपल्या परिसरातील लोकांना सुद्धा नायलॉन मांजाचे दुष्परिणाम सांगून त्यांना नायलॉन मांजा वापरू नका असे आवाहन करावे असे सांगण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सामाजिक वनीकरणाच्या सोनल ताकसांडे, महिला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री उपाध्ये उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे संचालन सुशांत भाके यांनी केले तसेच विद्यार्थिनींनी नायलॉन मांजा बंदी असलेली प्रतिज्ञा म्हटली.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**•युवाराष्ट्र दर्शन वणी :** शहरालगतच्या लालपुलिया परिसरात अज्ञात वाहनाने एका ५२ वर्षीय पादचाऱ्याला धडक दिली. या अपघातात ते जागीच ठार झाले. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. चेंडकू रामभाऊ आत्राम असे मृताचे नाव असून, ते पळसोनी येथील रहिवासी आहे. चेंडकू आत्राम हे त्यांची दुचाकी घेऊन लालपुलिया परिसरातील अमित नामक एका ढाब्यावर जेवणासाठी गेले होते. केरला टायर्सजवळ दुचाकी लावून ते जेवणासाठी रस्ता ओलांडून अमित ढाब्याकडे पायदळ जात होते. यावेळी मारेगाव-यवतमाळकडून वणीकडे भरधाव वेगाने येणाऱ्या एका वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली.

### मोटार पंप चोरी

**•युवाराष्ट्र दर्शन घाटंजी**

तालुक्यातील उंदरणी येथे शेतातील सौर ऊर्जेवर लावलेला मोटारपंप संच चोरट्यांनी लक्ष्य केला आहे. उंदरणी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. कविता देविदास पुसनाके यांच्या शेतातील विहिरीवर बसवलेला 'HAWKSON' कंपनीचा सौर ऊर्जा मोटार पंप अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. या पंपाची किंमत अंदाजे ७९,००० रुपये आहे. ही घटना २७ डिसेंबर २०२५ च्या रात्री ही घडली. याप्रकरणी सरपंच कविता पुसनाके यांनी दिलेल्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून तपास पथक चोरट्यांचा शोध घेत आहे.

### मालवाहू रिक्षाच्या धडकेत युवक ठार

**•युवाराष्ट्र दर्शन महागाव**
तालुक्यातील फुलसावंगी-किनवट मार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे.

# उपनगराध्यक्षपदी दत्तदिगांबर वानखेडे

## ढाणकी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांच्या 'कास्टिंग वोट'ने ठरला विजय



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १४ जानेवारी**

येथील नगरपंचायतीच्या पहिल्या ऐ तिहासिक सर्वसाधारण सभेत राज कीय घडामोडींना वेग आला असू न , उपनगराध्यक्षपदी शहर वि का स आघाडीचे दत्तदिगांबर वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत नगराध्यक्षांनी आपल्या 'निर्णायक मताचा'वापर केल्याने वानखेडे यांचा विजय सुकर झाला.

मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या उपस्थितीत आणि नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. उपनगराध्यक्षपदासाठी शहर विकास आघाडीकडून दत्तदिगांबर वानखेडे आणि भाजपकडून उमेश योगेवार यांनी अर्ज दाखल केले होते. मतदानादरम्यान दोन्ही उमेदवारांना प्रत्येकी ९-९ मते पडल्याने सभागृहात पेच निर्माण झाला. यावेळी नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांनी सदस्य म्हणून मतदान केल्यानंतर, मते समसमान झाल्याने आपले 'निर्णायक मत' वानखेडे यांना दिले आणि त्यांची निवड जाहीर केली.

नगराध्यक्षांच्या दुहेरी मतदानावर भाजप नगरसेवकांनी आक्षेप घेतला. मात्र, मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी २६ डिसेंबरच्या सरकारी अध्यादेशाचे वाचन करून स्पष्ट केले की, नगराध्यक्षांना सदस्य म्हणून मतदान करण्याचा आणि समसमान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

### शहराचा विकास करणार : अर्चना वासमवार

निवडीनंतर नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. "शहराच्या विकासाची मोठी जबाबदारी आमच्यावर आहे. कोणतीही गटतट न पाहता सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन ढाणकी नगरीचा सर्वांगीण विकास साधणार," असा विश्वास नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांनी व्यक्त केला. यावेळी नगरपंचायतीचे सर्व नवनिर्वाचित सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते



ढाणकी शहरातील जनतेने माझ्यावर विश्वास दर्शवून भरघोस मतांनी निवडून दिले व आज माझी उपनगराध्यक्षपदी निवड झाली त्याबद्दल सर्व ढाणकी कराचे आभार व्यक्त करतो. शहराचा विकासासाठी सदैव कटिबद्ध राहून शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिकपणाने प्रयत्न करीन जातीपातीचे राजकारणा न करता शहराचा विकास हेच ध्येय राहील. **-दत्तदिगांबर श्रीकृष्ण वानखडे शिंदे गट ढाणकी ढाणकी नगरपंचायत उपाध्यक्ष**

या स्पष्टीकरणानंतर वानखेडे यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले.

उपनगराध्यक्ष निवडीसोबतच रिक्त असलेल्या दोन स्वीकृत नगरसेवक पदांची प्रक्रियाही पूर्ण झाली. यामध्ये भाजपकडून रोहित वर्मा आणि शिवसेना (शिंदे गट) शहराध्यक्ष संजय सालेवाड यांची नियुक्ती करण्यात आली. या दोन्ही नेत्यांचे अर्ज वैध ठरल्याने त्यांची निवड झाल्याची घोषणा प्रशासनाकडून करण्यात आली.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, घाटंजी, दि. १४ जानेवारी**

घाटंजी शहरात नेहरु नगर येथे एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली आहे.

संबंधित युवक विक्की नामदेव पेटकुले मुळचा केळझर ता. आर्णी येथील रहीवासी असून वय (३० वर्ष) आहे. सदर ईसम कामानिमीत्य घाटंजीत आपल्या कुटूंब सह पत्नि हेमानी व दोन मुल मोठा वंश वय (७ वर्ष) लहान नक्ष (६ वर्ष) असे नेहरू नगर येथे भाड्याने रुममधे राहत होते. सदर ईसमास पिण्याचा नाद असल्याने किरकोळ घरी पत्निशि किरकोळ वाद होता होते.अशात मागिल काही दिवसापासून घरगुती वादातून पत्नि सासरी राहत असल्याने दि.१४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी अंदाजे ६ चे सुमारास भाड्याने राहत असलेल्या घरात सदर यूवकाने नायलॉन दोरीने गळफास घेत आत्महत्या केली.या घटनेची माहिती मिळताच घाटंजी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घाटंजी ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आला आहे.

# यवतमाळमध्ये रंगणार सहावे महावीर प्रीमियर लीग सीझन

### दि 15 ते 18 जानेवारीदरम्यान थरारक सामने

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ जानेवारी**

श्री महावीर युवक मंडळ, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महावीर प्रीमियर लीग सीझन ६ या भव्य क्रिकेट स्पर्धेला दिनांक 15 जानेवारी ते 18 जानेवारी 2026 दरम्यान तळेगाव भारी ग्राउंड, यवतमाळ येथे रंगतदार प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता होणार असून उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, लोकमत समूहाचे जिल्हाप्रमुख किशोर दर्डा, जैनसेवा समितीचे अध्यक्ष महावीर भन्साली, तसेच यवतमाळ जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजय सिसोदिया संदिप तातेड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या स्पर्धेत रॉयल किंग्स , लोढा लॉयन्स, आर.के. चॅलेंजर्स, गुरुदेव अवेंजर्स, परंपरा जेम्स, यश इन्व्हेस्टमेंट आणि जम्मू या बलाढ्य संघांचा सहभाग असणार आहे. प्रत्येक सामना चुरशीचा ठरणार असून प्रेक्षकांसाठी हा एक पर्वणीचा सोहळा ठरणार आहे.

स्पर्धेत विजेत्या संघास प्रथम पुरस्कार विनादेवी दर्डा स्कूल यांच्या वतीने तर द्वितीय पुरस्कार जैन सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहे. यासोबतच प्रत्येक सामन्यात 'मॅन ऑफ द मॅच' आणि संपूर्ण स्पर्धेसाठी बेस्ट बॅट्समन व बेस्ट बॉलर व 'मॅन ऑफ द सिरीज' असे आकर्षक पुरस्कार ठेवण्यात आले आहेत. या क्रिकेट स्पर्धेचा मनमुराद आनंद यवतमाळकरांनी घ्यावा, असे आवाहन श्री महावीर नवयुवक मंडळाचे अध्यक्ष समर्पण गांधी, सचिव पियुष तातेड, कोशाध्यक्ष दिपक बोरा व मंडळाच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

# ढाणकी उपबाजार समितीच्या गाळ्यांच्या लिलावाचा फज्जा

## अवास्तव किंमतीमुळे व्यापाऱ्यांनी फिरवली पाठ : ८.५० लाखांच्या बोलीवर लिलावधारकांचा तीव्र आक्षेप

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, ता. १४ जानेवारी**

उम रखेड कृषी उत्पन्न बाजार स मिती अंतर्गत येणाऱ्या ढाणकी उपबाजार समितीमधील १० दुकान गाळ्यांच्या लिलाव प्रक्रियेत दिनांक 13 जानेवारी 2025 रोजी मंगळवारी दुपारी 1 वाजता मोठा गोंधळ पाहायला मिळाला. प्रशासनाने एका गाळ्याची मूळ किंमत ८ लाख ५० हजार रुपये निश्चित केल्याने आणि त्याच किंमतीवरून बोली लावण्याचा आग्रह धरल्याने, उपस्थित सर्व २४ व्यापारी व शेतकऱ्यांनी या लिलावाकडे पाठ फिरवली. परिणामी, हा लिलाव होऊ शकला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, या लिलावासाठी २४ इच्छुकांनी प्रत्येकी १० हजार रुपये अनामत रक्कम जमा केली होती. लिलाव प्रक्रिया सुरू होताच बाजार समितीने साडेआठ लाख रुपयांपासून बोली सुरू करण्याचे जाहीर केले. मात्र, व्यापाऱ्यांच्या मते मार्केट व्हॅल्युएशननुसार या गाळ्यांची किंमत साधारण ३ लाख रुपयांच्या आसपास असायला हवी होती. बाजार समितीने व्यापाऱ्यांच्या हिताचा विचार न करता अवास्तव किंमत लावल्याचा आरोप करत लिलावधारकांनी नाराजी व्यक्त केली आणि जमा केलेली अनामत रक्कम परत घेण्यास सुरुवात केली.

केवळ किंमतच नाही, त र गाळ्यांच्या जागेवरही लिलावधारकांनी आक्षेप घेतला आहे. ज्या ठिकाणी हे गाळे बांधले जात आहेत, त्या ठिकाणचा रस्ता अत्यंत अरुंद आहे. या परिसरात मालाची जड वाहतूक करणे कठीण असून, वाहने उभी राहिल्यास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊ शकते. अशा गैरसोयीच्या जागेसाठी इतकी मोठी रक्कम मोजणे व्यवहार्य नसल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.

यावेळी बाजार समितीचे सचिव संदीप जाधव, उपसभापती श्रीपाल आडे, बांधकाम समिती प्रमुख भीमराव चंद्रवंशी, संचालक गजानन गाडेकर यांच्यासह इतर संचालक आणि कर्मचारी उपस्थित होते. आता तीन दिवसांनंतर बाजार समिती यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> **"आम्ही ८ लाख ५० हजार रुपयांच्या वर बोली लावणाऱ्या कोणत्याही धारकाला दुकान देऊ शकतो, एकूण 24 अनामत धारक आले यांना यावर विचार करण्यासाठी तीन दिवसांचा वेळ देण्यात येत आहे,"**
> **-सभापती कृष्णा पाटील देवसरकर, उमरखेड कृषी उत्पन्न बाजार समिती**

# जि.प. निवडणुकीबाबत काँग्रेसची बैठक



**•युवाराष्ट्र दर्शन, दारव्हा**

दारव्हा तालुका व दारव्हा शहर युवक काँग्रेसची आढावा बैठक दिनांक 14 जानेवारी रोजी काँग्रेस कार्यालय दारव्हा येथे युवक काँग्रेस संघटन मजबुतीसाठी तसेच युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती करिता युवकांना अधिक स्थान मिळाले पाहिजे तसेच विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष व शहर युवक काँग्रेस अध्यक्ष यांची निवड करण्याकरीता ही बैठक आयोजित केली होती या बैठकीला माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद बगाडे, दारव्हा तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश नवरंगे, नगरपरिषद गट नेते सय्यद फारुख, दारव्हा तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष अतुल राऊत,जिल्हा युवक काँग्रेस संघटक फैसल पटेल,जिल्हा युवक काँग्रेस उपाध्यक्ष इरफान खान, दारव्हा तालुका सेवादल काँग्रेस अध्यक्ष रामधन जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले, नवनिर्वाचित नगर सेवक सरफराज खान, मसूद खान, अजीम शहा, मोहम्मद जुनेद, यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला,,,यावेळी उपस्थित दारव्हा तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष, अक्षय डोंगरे, नावेद खान,चंदू बिबेकर,सदस्य,गजानन देशमुख, इमरान खान,नईम खान,अशोक बोरचाटे, दीपक दिवे, किसन ढेपे, भीमराव पवार, दिनेश पाटे,दीपक नवरंगे, इस्राईल निरबान,अंशुल गडपायले, सागर कोटमकार, रवि गायनर, संतोष फूसांडे, सचिन वैद्य, गणेश पवार, विशाल देशमुख, नंदकिशोर महाले, मनोज राऊत, अमोल राऊत, अंकुश तायडे, अनंता ठाकरे, प्रशिक भगत, अमोल जटाळे, सचिन बांबल, संदीप तिरमारे,अमोल इंजाळकर, करण राठोड, जुबेर पटेल, हैदर अली, विशाल महले, प्रज्वल गावंडे, सागर देशकरी, आतिश हजारे, सतिश बागल सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# शिक्षक समितीतर्फे चेतना मेळावा व मार्गदर्शन शिबीर

**•युवाराष्ट्र दर्शन, प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. १४ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा पांढरकवडा च्या वतीने स्थानिक लोकमंगल कार्यालयात शिक्षकांसाठी भव्य चेतना मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा नेते नानासाहेब नाकाडे, उद्घाटक म्हणून बाबासाहेब कपिले, संस्थापक जिल्हा शिक्षक समिती तथा माजी राज्य सरचिटणीस, गजानन देऊळकर, माजी जिल्हा सरचिटणीस, किशोर सरोदे माजी जिल्हा कार्याध्यक्ष, इनायत खान,उर्दू शिक्षक संघटना, रविंद्र उमटे,जिल्हा कार्याध्यक्ष, महेश सोनेकर अध्यक्ष कर्मचारी पतसंस्था र.नं.१०९, श्रीमती सुनिता जतकर, अध्यक्ष जिल्हा महिला आघाडी, सुरेंद्र लिंगरवार, संघटक शिक्षक समिती,



चेले, जिल्हा उपाध्यक्ष, गोकुळ गंधे, गटशिक्षणाधिकारी पं.स.पांढरकवडा, गौतम सामृतवार, अध्यक्ष से.नि. शि.संघटना, सर्व तालुक्याचे शिक्षक समिती अध्यक्ष व सचिव विजया राऊत, संचालिका कर्मचारी पतसंस्था र.नं.१०९ यांचेसह सर्व संचालक कर्मचारी पतसंस्था यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. स्वागत गीतगायन उज्वैन गेडाम यांनी केले. कार्यक्रमात उत्कृष्ट कायनि तालुक्याचे नावलौकिक केले तसेच विविध स्पर्धामध्ये निवड झाली अशा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक समिती पांढरकवडा शाखेचे अध्यक्ष विजय मालकापुरे,सचिव कवडू गेडाम,कार्याध्यक्ष आशिष चव्हाण,कोषाध्यक्ष प्रशांत आमडे,जिल्हा संघटक आनंद खनके, संघटक विलास सामृतवार, उपाध्यक्ष रमेश कावडे, अविनाश ताकसांडे, राजेंद्र बुर्रेवार, कार्या.सचिव सोमेश्वर पौनीकर यांचेसह अनिल येडलावार, कैलास मडावी,अमृत गंद्रतवार, दिनेश घाटोळ,पवन बोम्मावार,दिलीप पटले,अनुप बक्कीवार, शंकर तवटे,प्रकाश जगताप,प्रवीण ताटकुंटवार, नंदकिशोर आंबटकर, उत्तमसिंग ठाकूर, कमलेश पाल, विजय काळे,समीर कुरटकर, फिरोजखान पठाण, उद्धव कोडापे,विशेष चांदेकर, व्यंकटेश पार्लावार, मनोज खैरे, गजानन गेडाम, उमेश मेश्राम, प्रदीप येल्के, भारत करमनकर, रविंद्र पडलवार, राजू उप्पुवार, प्रवीण सिडाम, महेंद्र इंगळे, महेंद्र मेश्राम, सुनिता गेडाम,चंदा केराम,मंजू सुब्बनवार,शीतल तिवस्कर, अनुराधा भादिकर,जया सोनकुसरे,जया रेकावार, इंदिरा जुमनाके,वंदना कोवे, रेखा गेडाम,कविता वनकर, सुवर्णा धुर्वे नीता गेडाम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले.

# राजू तुरणकर यांचा शहर संपर्क प्रमुख पदाचा राजीनामा

## वणीच्या राजकीय वर्तुळात खळबळ




**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १४ जानेवारी**

वणी शहरातील शिवसेनेचे निष्ठावंत व अनुभवी नेतृत्व म्हणून ओळख असलेले राजू तुरणकर यांनी शहर संपर्क प्रमुख या पदाचा राजीनामा दिल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राजूतुरणकरयांनीआपल्याराजकीयप्रवासात माजी विद्यार्थी तालुका प्रमुख (1994 ते 2006), माजी नगरसेवक (2006 ते 2011), शहर प्रमुख (2014 ते 2020) तसेच शहर संपर्क प्रमुख (2025) अशी विविध जबाबदारीची पदे प्रामाणिकपणे भूषविली आहेत. संपूर्ण वणी शहरात एक निष्ठावंत शिवसैनिक, निर्मळ व स्पष्ट व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिवसेनेसाठी समर्पित केले.

या कालावधीत पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी निष्ठेने पार पाडली. तसेच प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे व संत गाडगे बाबा यांच्या विचारांवर चालत अनेक सामाजिक उपक्रम राबविले. शिवसेनेच्या "८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण" या ध्येयधोरणानुसार वणी शहर व परिसरात पक्षाची प्रतिमा उंचावण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. पक्षाच्या धोरणांसाठी आंदोलने केली, जेलवारी पत्करली, तसेच अनेक गुन्हे अंगावर घेतले. मात्र या सर्व काळात त्यांनी पक्षाकडून कधीही कोणतीही अपेक्षा ठेवली नाही. २०२५ मध्ये झालेल्या वणी नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक २ मधून पक्षातर्फे निवडणूक लढविली. मात्र या निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला. शहरातील पक्ष संघटना व धोरणे पूर्णपणे अपयशी ठरल्याने, नगराध्यक्ष पदाचा उमेदवारसुद्धा पराभूत झाला, अशी खंत अनेक निष्ठावंत शिवसैनिक व्यक्त करीत आहेत. काँग्रेस, मनसे व संभाजी ब्रिगेड यांची भक्कम युती असतानाही पदाधिकाऱ्यांचा एकही सामूहिक मेळावा घेण्यात आला नाही.

कोणत्याही प्रमुख नेत्यांची सभा, प्रचार रॅली किंवा प्रभावी जनसंपर्क न झाल्यामुळे हातात असलेला विजय पराभवात बदलला, अशी तीव्र नाराजी कार्यकर्त्यांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. मात्र त्या कार्यक्रमाच्या रूपरेषेत शहर संपर्क प्रमुख राजू तुरणकर व शहर संघटक मनीष बत्रा यांचा कुठेही उल्लेख करण्यात आला नाही.

यापूर्वीही अशाच प्रकारांकडे लक्ष वेधूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे. या वागणुकीमुळे पक्षात फूट पाडली जात असून, निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अवमान व अपमान केला जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. या सर्व कारणांमुळे मानसिक त्रास सहन करीत, कोणताही वाद न वाढवता राजू तुरणकर यांनी शहर संपर्क प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे.

# सरकारचा मनरेगा योजना बंद करण्याचा डाव

## माणिकराव ठाकरे यांचा आरोप : काँग्रेसचे आंदोलन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ जानेवारी**

केंद्र सरकार मनरेगा योजना बंद करण्याचा डाव आखत आहे. मात्र या विरोधात काँग्रेससह एनजीओही तसेच मजुर संघटना राज्यव्यापी आंदोलन करणार आहे, अशी माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रभारी (गोवा, दीव, दमण व दादरा नगर हवेली) माणिकराव ठाकरे यांनी बुधवारी (दि. १४) पत्रकार परिषदेत दिली.

माणिकराव ठाकरे म्हणाले की, सन १९७२ मध्ये दुष्काळ



पडला होता. त्या काळात शेतमजुरांना काम उपलब्ध नव्हते. त्यावेळी जनतेकडून मागणी आल्याने तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजना लागू केली. या योजनेमुळे लाखो गरजू लोकांना मजुरीचे काम मिळाले. पुढे केंद्रात डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान व सोनीया गांधी यांच्या सहकार्याने मनरेगा कायद्याद्वारे देशभरातील नागरिकांना रोजगाराचा कायदेशीर अधिकार मिळाला. या योजनेचा फायदा आजही ग्रामीण भागातील कोट्यवधी लोक घेत आहेत. ही योजना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने सुरू करण्यात आली होती. मात्र, भाजपा मोठ्या उद्योगपतींना फायदा करून देत असून मनरेगा योजना बंद करण्याचा डाव रचत आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला.

रोजगार हमी योजना भ्रष्टाचाराची होती म्हणून बंद करीत आहोत असे भाजपाकडून बोलल्या जात आहे. मात्र या योजनेमधून विहिर, पांदण रस्ते, नालाबंडीचे काम मजूरांना मिळत होते. तसेच १०० दिवस काम देणे बंधनकारक होते हाताला काम मिळत नसल्यामुळे काम जर देण्यात आले नाही तर त्या मोबदल्यात ठराविक रक्कम द्यायची असते मात्र यामध्ये भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप भाजपाने केला आणि ती बंदच पाडणार असल्यामुळे काँग्रेससह एनजीओ राज्य, जिल्हा गाव स्तरावर या विरोधात भूमिका घेणार असल्याचे माणिकराव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पत्रकार परिषदेला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल मानकर, अनिल गायकवाड उपस्थित होते.

### मनरेगा बचाव संग्राम

**या विरोधात काँग्रेससह एनजीओ देशभर आंदोलन करणार असून 'मनरेगा बचाव संग्राम' आंदोलन जिल्हा व गाव पातळीवर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी जाहीर केले. भाजप सरकारच्या धोरणांचा काँग्रेस पक्ष तीव्र निषेध करत असून गरीब, शेतमजूर आणि कष्टकरी जनतेच्या हक्कासाठी लढा सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# चारोडे यांच्या वतीने देऊरवाडी शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १४ जानेवारी**

राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती यांच्या औचित्याने शिवसेना उपशहर प्रमुख आर्णी मनोज चारोडे यांच्या वतीने नगरपरिषद प्राथमिक मराठी शाळा, देऊरवाडी पुनर्वसन येथील विद्यार्थ्यांना पेन, वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक गजानन काठोळे व सर्व शिक्षकवृंद, शिवसेना उपशहर प्रमुख मनोज चारोडे, नगरसेविका छबुताई चारोडे, गोपाल बांगर, बालाजी धुमाळ, विनोद लोहट यांच्यासह प्रणव राठोड, यश चौधरी, ओम गुप्ता, मयूर राठोड, शिवम चारोडे, संतोष चौधरी, आदित्य चारोडे, ओम चारोडे, सनी अलोने, निखिल अलोने तसेच सर्व मित्रपरिवार उपस्थित होता

# शहरात राष्ट्रसेविका समितीचे पथसंचलन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. १४**

राष्ट्रसेविका समिती ही विविध माध्यमातून समाजात सेवा, समर्पण व राष्ट्रभक्तीचे बिजारोपण करणारी संघटना असून, वंदनीय मावशी केळकर यांच्या पुण्य स्मृती प्रित्यर्थ राष्ट्रसेविका समितीच्या वतीने प्रथमच पथसंचलन करण्यात आले.

येथील श्रीराम शाळा प्रांगण, कसबा येथून पथसंचलनास सुरुवात होऊन ते शालिग्राम शाळा प्रांगण, स्टेशन वार्ड येथे सांगता झाली. या पथसंचलन मध्ये ५५ गणवेश सेविका व मंगल वेशधारीत होत्या.

साधना पेंडके यांच्या मार्गदर्शनात श्रीराम शाळा येथे पथसंचलनाची शाखा घेण्यात आली. प्रार्थना आणि सांघिक गीत ज्योती कुलकर्णी, वंदे मातरम शिवानी देशपांडे यांनी गायन केले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात जोत्सना गिरधर, ॲड. अरूणा देशपांडे व कविता जोशी यांनी मार्गदर्शन केले.

पथसंचलनाला नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, तालुका संघचालक रमेश नागोसे, जिल्हा कार्यवाहीका अनुराधा भोकरे, जिल्हा सहकार्यवाहीका कल्पना मशानकर, जिल्हा संपर्क प्रमुख उज्वला केळकर व शारीरिक प्रमुख सुप्रिया अभ्यंकर, अर्पणा झाडे यांचे सह संघ पदाधिकारी, रामनवमी शोभायात्रा समितीचे योगदान व सहकार्य लाभले. समारोपिय कार्यक्रमात आभार अर्चना देशपांडे यांनी मानले.

# प्रत्येक गरजू लाभार्थ्यांना घरकुल देण्याचा शासनाचा प्रयत्न - पालकमंत्री डॉ. भोयर

## सुकळी स्टेशन येथे पट्टेवाटप कार्यक्रम

## २१ लाभार्थ्यांना मिळाली हक्काची जागा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

प्रत्येकाला आपल्या स्वत:च्या घराचे स्वप्न असते. त्यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्यावतीने समाजातील प्रत्येक गरजू कुटूंबाना घरकुल उपलब्ध करुन देण्यासोबतच अतिक्रमीत जागेवर वास्तव्य करीत असलेल्या जागेचे अतिक्रमण नियमानुकुल करुन पट्टे देण्याचा प्रयत्न असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

सेलू तालुक्यातील सुकळी स्टेशन येथे अतिक्रमण नियमानुकुल झालेल्या लाभार्थ्यांना पट्टे वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते. कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, तहसिलदार शकुंतला पाराजे, गट विकास अधिकारी देवानंद पानबुडे, सुकळीच्या सरपंच निलम जाधव, उपसरपंच प्रमोद तडस, लाभार्थी कौशल्याताई थुल आदी उपस्थित होते.

राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व प्रमाणपत्राचा लाभ लाभार्थ्यांना थेट एकाच ठिकाणी मिळावा यासाठी वर्धा जिल्ह्यात प्रथमच सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात आले. या अभियानाची अंमलबजावणी आता राज्यभर करण्यात येत आहे. सेवा पंधरवाडाचा एक भाग म्हणून लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकुल करुन त्यांना पट्टे वाटप करण्यात येत आहे. पट्टे वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी अर्ज केल्यास त्यांना घरकुल मंजूर करण्यात येईल, असे पालकमंत्री डॉ. भोयर पुढे बोलतांना म्हणाले.

देशाची संस्कृती ज्या सणातून प्रतिबिंबीत होते, अशा मकरसंक्रातदिनी लाभार्थ्यांना हक्काची जागा उपलब्ध झाली आहे. ही आनंदाची बाब आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकांसाठी शासनाच्यावतीने विविध योजना राबविण्यात येतात.

या योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा. सेलू येथे नव्याने बांधण्यात येणाऱ्या तहसिल व कृषि कार्यालयातून विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. नागरिकांनी जागृत राहून योजनांचा लाभ घ्यावा, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

गेल्या ४४ वर्षांपासून अतिक्रमीत असलेल्या जागेचा प्रश्न निकाली निघाल्यामुळे आता गावकऱ्यांना हक्काची जागा मिळाली असल्याचे सरपंच निलम जाधव म्हणाल्या. सुकळी स्टेशन येथे ३३ लाभार्थी अतिक्रमीत जागेवर ३० ते ३५ वर्षांपासून वास्तव्य करीत होते. या ३३ लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकुल करुन त्यांना पट्टे मंजूर करण्यात आले. यापैकी १२ लाभार्थ्यांना यापुर्वी राजस्व अभियानांतर्गत पट्टे देण्यात आले असून आज २१ लाभार्थ्यांना पट्याचे वितरण करण्यात येत असल्याचे प्रास्ताविकात तहसीलदार शकुंतला पाराजे यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते सर्व २१ लाभार्थ्यांना शासकीय जमिनीच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन श्री. साटोणे यांनी केले. कार्यक्रमाला गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील सहभाग रोटरीच्या माध्यमातून वाढवावा - खासदार काळे




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१४**

रोटरीच्या माध्यमातून असलेल्या सीएसआर फंडाची मदत घेऊन शैक्षणिक, आरोग्य, सामाजीक क्षेत्रात आपण चांगले उपक्रम राबवू शकतो. खासदार म्हणून मी सुध्दा यात सहभागी असेल व लोकप्रतिनिधी म्हणून जी मदत लागेल ती करण्यास मी तयार आहे आपण मदत घ्यावी. माझे संपूर्ण सहकार्य असेल असे मत खासदार अमर काळे यांनी व्यक्त केले.

नुकत्याच पार पडलेल्या रोटरी उत्सवात खासदार अमर काळे यांनी भेट दिली. यावेळी ते बोलत होते. खासदारअमर काळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन रोटरी पदाधिकाऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. रोटरी उत्सव हा वर्धेकरांना एक मोठी पर्वणीच असते. प्रत्येक वर्धेकर आपला विरंगुळा म्हणून कौटूंबीक रोटरी उत्सवात येत असतो. त्यांनी स्टॉल्सला भेटी दिल्यात. यावेळी संजय मानमोडे, संदीप कीटे, प्रणय कदम आदी उपस्थित होते.

# नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा दि.१४**

नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत जिल्हा पुनर्वसन केंद्रासाठी इच्छुक असलेल्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव दिव्यांग आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येणार आहे.

प्रस्ताव सादर करण्यासाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना, उपक्रम राबविल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. संस्थेच्या स्वत:च्या नावे असलेली जागा, इमारत अथवा भाडे कराराने घेतलेली इमारत असावी. सदर इमारत अडथळा मुक्त व सुगम्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र, समुपदेश, थेरपीसाठी तज्ञ व्यक्ती तसेच आवश्यक व पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असावे. संस्थेच्या बँक खात्याचा तपशिल असणे आवश्यक आहे.प्रस्ताव सादर करतांना काही अडचण असल्यास जिल्हा समाज कल्याण कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी कळविले आहे.

# वाहनाच्या धडकेत दोघे झाले जखमी

**वर्धा,:** गजानन महाराजांची मिरवणूक बघण्यासाठी गेलेल्या दोघांना वाहनाने धडक दिली, त्यात ते गंभीर जखमी झाले, ही घटना वर्ध्याच्या न्यू रेल्वे कॉलनी परिसरात घडली, अनिल टिकाराम आस्कर (६०, रा. न्यू रेल्वे कॉलनी) व दिगांबर भाऊराव लकडे असे जखमीचे नाव आहे, याप्रकरणी अनिल आस्कर यांनी रामनगर पोलिसात तक्रार दिली, त्यावरुन वाहनचालक ओम क्षीरसागर (रा. हरिओम नगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला, जखमी हे वाहन क्रमांक एम. एच. ४९ व्ही. ७७४५ ने मिरवणूक बघण्यासाठी गेले होते.

# आग्या मोहाच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू

## १२ महिला तर एक पुरुष जखमी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वायगाव (नि.),दि.१४**

नजीकच्या शिवनगर (देऊळगाव) येथील शेतात असलेल्या रेणुका मातेच्या मंदिरात रविवारी (दि. ११) दुपारी १.३० वाजता आग्या मोहाच्या हल्ल्यात सुलभा शरद खेकरे (वय ४५) यांचा मृत्यू झाला.मंदिरात भजन सुरू असताना अचानक मंदिराच्या बाजूला असलेल्या झाडावरील आग्या मोह उडाला. या आग्या मोहाने भजन करणाऱ्या मंडळींवर हल्ला केला. या



घटनेत सुलभा खेकरे यांच्यासह एकूण १२ महिला आणि पकवाज वाजवणारे भार्गव मैनताम (वय ६५) जखमी झाले.

हल्ल्यात सुलभा खेकरे व भार्गव मैनताम हे दोघे गंभीर जखमी झाल्याने त्यांना सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. इतर जखमींवर प्राथमिक उपचार करण्यात आले. उपचारादरम्यान सोमवारी सकाळी १० वाजता सुलभा शरद खेकरे यांचा मृत्यू झाला. दरम्यान, भार्गव मैनताम यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

# पहेलवानांनी आपल्या खेळाकडे लक्ष देवुन लक्ष्य साध्य करावे- माजी खासदार तडस

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

ग्रामीण खेळाला चांगल दिवस आणावयाचे असेल तर गावोगावी मातीचे खेळ व्हायला हवे, शाळांमध्ये होणारे पीटीचे तासही टाईमपास करायचे तास मानले जाऊ लागले. क्रीडा क्षेत्रातील ग्रामीण भागातील क्षमता ओळखुन केन्द्रसरकार व राज्यसरकारने क्रीडा नविन धोरण स्विकारल्यामुळे खेळाला चांगले दिवस येऊ लागले आहे, ग्रामीण खेळाचे महत्व वाढु लागले आहे, खेला इंडीया, राज्यस्तरीय स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा मध्ये शहरासोबत ग्रामीण भागातील खेळाडुंना संधी मिळत आहे. खेळ माणसाला विविध गोष्टी शिकवतो. त्यामुळेच खेळाचा उपयोग योग्य केल्यास त्याचा फायदा आपल्या सोबतच देशाला होतो, पहेलवानांनी आपल्या खेळाकडे लक्ष देवुन आपले पुढचे लक्ष्य साध्य करावे असे



मत महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा माजी खासदार रामदास तडस यांनी व्यक्त केले. अल्लीपूर येथे शंकर पट व्यवस्थापन कमेटी व वर्धा जिल्हा कुस्तीगीर तालिम संघाव्दारा आयोजित महीला व पुरुष गट राज्यस्तरीय कुस्ती दंगल स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या हस्ते व माजी खासदार सुरेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मदनसिंग चावरे, माजी जि.प. अध्यक्ष नाना ढगे, माजी सदस्य अशोक सुपारे, वामनराव खोडे उपस्थित होते.

महीला व पुरुष गट राज्यस्तरीय कुस्ती दंगल स्पर्धा ४०,४६,५२,५८,६३,७० व खुला वनज गटात असुन महाराष्ट्रातील पुणे, वर्धा, अमरावती,चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम,सोलापूर, चंद्रपूर, भंडारा येथील १५० पेक्षा जास्त महिला व पुरुष पहेलवान सहभागी झाले असुन त्यांना अल्लीपूर शंकर पट व्यवस्थापन कमेटीच्या विजेत्या पहेलवानांना वतीने रोख रक्कम व ट्राफी देण्यात येणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शंकरपट व्यवस्थापन कमिटीचे श्रीराम साखरकर,गोपाल मेघरे,गोपाल गिरडे व वर्धा जिल्हा कुस्तीगीर तालिम संघच्या सर्व सदस्यानी प्रयत्न केले कार्यक्रमाला धनराज घुसे, उमेश बेलखेडे,विनोद ठाकरे, प्रल्हाद. चांभारे, अरूण वरणे, मधुकर महाजन, प्रविण देशमुख, शंकर कामडी,रविंद्र वानी, चंदशेखर चांभारे, अशोक सुरकार, किरण ढगे, भुषण खंडरे, धिरज चांभारे, आकाश वादिले, निलेश तपासे, शंकर महाकाळकर, अमोल वरभे, प्रफुल गोते, डॉ.. मयुर कातोरे, रोहित कलोडे, दिनेश सायंकार, शोभा वाटखेडे, मंगेश कलोडे, गोपाल शिवणकर, शरव कारवटकर, रणदिप माधुरकर, निलेश पोंगडे, कैलास बाळबुधे, स्मिता खोंड, कैलास नागरे, संदिप नरड व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# नगरपालिका उपाध्यक्ष व स्विकृत सदस्यांची निवड













■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. १४**

नगर परिषदेचे नवनियुक्त उपाध्यक्षपदी निलेश ठोंबरे यांची निवड तर स्विकृत सदस्य पदी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार ) चे ॲड सुधीर दौलतचंद कोठारी तर भारतीय जनता पक्षाचे वतिने किशोर दिघे अंकुश ठाकुर तर माजी नगरसेविका शारदा भारतलाल पटेल यांची स्विकृत सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली.

उपाध्यक्षपदी दीपक आहुजा भाजप तर्फे शरद सावरकर तसेच कॉंग्रेस तर्फे रवी केशरवाणी यांची वर्णी

**पुलगाव :** नगरपालिकेच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत कॉंग्रेस तर्फे दीपक आहुजा व भाजप तर्फे दुर्गेश यादव यांनी नामांकन दाखल केले होते उपाध्यक्ष पदाच्या या निवडणुकीत दुर्गेश यादव यांना आठ तर दीपक आहुजा यांना १४ मते मिळाली त्यामुळे आहुजा यांना उपाध्यक्ष म्हणून विजयी घोषित करण्यात आले. नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर कृउबा सभापती मनोज वसू यांनी उपाध्यक्षाचे स्वागत केले. सध्या नगरपालिकेत कॉंग्रेसकडे १२ भाजपकडे आठ व एक अपक्ष असे पक्षीय बलाबल आहे स्वीकृत सदस्य पदी शरद सावरकर व रवी केशरवाणी नगरपालिकेत असलेल्या २१ सदस्य संख्येच्या आधारे दोन स्वीकृत नगरसेवक नगरपालिकेत असतात. त्यामुळे भाजप तर्फे शरद सावरकर तर कॉंग्रेस तर्फे रवी केशरवाणी यांची वर्णी लागली दोन्ही पक्षात पदोपदी नावाची फेरबदल होत गेले अखेर सावरकर व केशरवाणी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला.

**सिंदी रेल्वे :** सत्ताधारी गटाकडुन भाजपच्या शहराध्यक्षा अजया साखळे, तर विरोधी गटाकडुन राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष गंगाधर कलोडे या दोन्ही शहराध्यक्षाना स्विकृत सदस्यपदी निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी भाजपचे नगरसेवक अकील शेख ( १२ मते ) घेत कॉंग्रेसचे नगरसेवक सुरज कोपरकर (९ मते) यांचा पराभव करीत विजय संपादन केले.

नुकत्याच झालेल्या पालिका निवडणुकीत २० सदस्य संख्या असलेल्या सिंदी रेल्वे नगरपालीकेत सत्ताधारी भाजपाच्या गटनेते पदी प्रविण मडावी तर विरोधी पक्ष राष्ट्रवादी (एझ) आणि कॉंग्रेस मिळवुन बनविलेल्या सिंदी विकास गटनेतेपदी अजय कलोडे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.विशेष म्हणजे दोन्ही गटांचे गटनेते पहिल्यांदाच निवडुन आले आहे.विशेष म्हणजे दोन्ही गटांचे गटनेते पहिल्यांदाच निवडुन आले आहे.

सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्षा सहीत दहा सदस्य निवडुन आले असून पालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत असुन सोबत भाजपचे माजी नगरसेवक अमोल बोंगाडे यांची पत्नी विद्यमान अपक्ष नगरसेवीका ममता बोंगाडे या सुध्दा सत्ताधारी भाजप गटात सहभागी झाल्याने संख्या ११ अधिक नगराध्यक्षा अशी झाली असुन पहील्यांदाच निवडुन आलेले प्रविण मडावी यांची गटनेतेपदी वर्णी लागली आहे.तर विरोधात राष्ट्रवादी ५ सदस्य आणि कॉंग्रेस ४ सदस्य मिळुन ९ सदस्याचा 'सिंदी शहर विकास गट ' नावाने विरोधी गटाची निर्मीती करण्यात आली असुन गटनेतेपदी कॉंग्रेसचे पहिल्यांदाच नगरसेवक बनलेले अजय कलोडे यांची एकमताने निवड करण्यात आली.

# परिवर्तन मिशन स्कूलचे विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १४**

४ व ७ जानेवारी २०२६ ला दिल्ली येथे पार पडलेल्या १९ व्या राष्ट्रीय प्लोअर बॉल स्पर्धेत परिवर्तन मिशन स्कूलचे विद्यार्थी सम्यक इंगळे (कर्णधार), गिरीश मेंढे, मयंक दाभने, दक्ष जिंदे या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करीत झंजावती खेळाचे प्रदर्शन करुन संघ भावनेच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघावर मात करुण दणदणीत विजय प्राप्त केला.

कर्णधार सम्यक इंगळे यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्र संघाने राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली, या गौरवास्पद कामगिरीबद्दल शाळेत आयोजित विशेष कार्यक्रमात शाळेच्या वतीने विजयी स्पर्धकांचा प्रमाणपत्र दव मेडल देऊन सन्मान करण्यात आला.

विजयी विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक विष्णू वाडे व मुख्याध्यापक आशिष मासोदकर यांना देतात, तसेच भविष्यात होणाऱ्या स्पर्धेबददल शुभेच्छा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

